# Positive Story of Nagpur Rural Police

दिनांक ०७/०७/२०२६

## MARVEL या कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाने पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत अज्ञात महिलेवरील लैंगिक अत्याचार व खून प्रकरणाचा गुन्हा उघड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात तसेच तपास अधिकारी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात नागपूर ग्रामीण पोलीस दलाने अत्यंत संवेदनशील अशा अज्ञात महिलेवरील बलात्कार व खून प्रकरणाचा तपासादरम्यान अत्याधुनिक **MARVEL ( Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement)** या कृत्रिम बुद्धिमत्ता—आधारित तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून तसेच वैज्ञानिक व तांत्रिक तपास पद्धतींच्या साहाय्याने उपलब्ध पुराव्यांचे बारकाईने विश्लेषण करून तपासाची साखळी उभी करण्यात आली. या अथक व शास्त्रशुद्ध तपासातून सदर गुन्ह्याचा यशस्वीरित्या उलगडा करीत आरोपीस अटक केली आहे.

घटनेची थोडक्यात हकीकत:—

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा पाटणसावंगी शिवारातील छत्रपाल इंगोले यांच्या शेतात एका अंदाजे ६५ ते ७० वर्षाच्या महीलेचे प्रेत मिळुन आले. सदर घटना दिनांक २७/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपासून ते दिनांक २८/०६/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेदरम्यान मौजा पाटणसावंगी शिवारातील छत्रपाल इंगोले यांच्या

शेतात घडली असुन सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे अकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात आली होती. मृतक महीलेच्या शवविच्छेदनानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी सदर मृतक महीलेवर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करून तिचा खुन केल्याची माहीती दिली. सदर प्रकरणी सावनेर पोलीस स्टेशन येथे अपराध क्रं ६५७/२०२६ कलम ६४,१०३(१), भान्यसं अन्वये अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

<u>तपासातील आव्हाने :—</u>

सदर गुन्हयात मृत महिला पूर्णपणे अनोळखी असल्याने त्याचबरोबर आरोपीबाबत कोणताही धागादोरा, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अथवा प्राथमिक पुरावा उपलब्ध नसल्याने तपास अत्यंत गुंतागुंतीचा व आव्हानात्मक होता.

<u>पोलीस तपासाचा कृती आराखडा :—</u>

सदर गुन्हयाचे गांभीर्य आणि संवेदनशिलता लक्षात घेऊन मा. श्री हर्ष ए. पोद्दार , वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आरोपी शोध कामी विविध पथकाची स्थापना करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा, सावनेर पोलीस स्टेशन, केळवद पोलीस स्टेशन आणि सायबर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार यांनी विशेष परिश्रम घेवुन सदर गुन्हा उघड केला आहे. तपासादरम्यान **MARVEL** या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या आधारे करण्यात आलेली महत्त्वाची कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

- पीडित मृत महिलेचा चेहरा सडलेल्या अवस्थेत असल्यामुळे तिची ओळख पटविण्यासाठी **Marvel AI Photo Enhancement** तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तिच्या चेहऱ्याची पुनर्रचना (**Face Reconstruction**) करण्यात आली. **Reconstructed** चेहऱ्याच्या आधारे सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून महिलेची ओळख व शोध घेण्याचे प्रयत्न करण्यात आले.

- तपासादरम्यान परिसरातील एकूण १८२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज बारकाईने तपासण्यात आले.
- घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. तपासादरम्यान पीपळा ते दहेगाव परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी दिसुन आला. आरोपीचे दूरचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाल्यानंतर **Marvel AI Photo Enhancement** तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आरोपीच्या चेहऱ्याची व शारीरिक ठेवणीची (**Face & Body Reconstruction**) पुनर्रचना करण्यात आली. तसेच तांत्रिक विश्लेषणातून आरोपी चे लोकेशन नागपूर शहर परिसरात असल्याची माहिती प्राप्त झाली. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या प्रत्यक्ष चेहऱ्याची **Marvel AI Photo Enhancement** द्वारे **Reconstructed** चेहऱ्याशी आणि शरिरीक रचनेची तुलना करण्यात आली असता सुमारे ८५ टक्के साम्य दिसुन आले.
- तपासादरम्यान घटनास्थळावर मिळालेल्या चिप्सच्या पॅकेटच्या रॅपरचाही शास्त्रशुद्ध पद्धतीने तपास करण्यात आला. परिसरातील संबंधित चिप्स विक्रेत्यांची माहिती संकलित करून त्यांच्या ऑनलाइन व्यवहारांच्या नोंदींचे विश्लेषण करण्यात आले.
- सदर प्रकरणाच्या तपासात परीसारातील सुमारे ५००० **Telecom Data Trajectory** व **Mapping** करण्यात आले.
- सदर प्रकरणाच्या तपासात परीसरातील ८० ते ९० कामगार व इतर व्यक्तींची चौकशी करण्यात आली. तसेच घटनास्थळाजवळील विटभटटी व फार्म हाउस ला भेट देवुन विचारपुस करण्यात आली.
- १५,००० वाहनांचे प्रादेशिक परिवहन विभागाकडुन माहीती प्राप्त करून विश्लेषन करण्यात आले.

- पीडित/मृतक महिलेचा ओळख पटविणे कामी **ICJC** पोर्टल , **NATGRID** पोर्टल या तंत्रज्ञनाचा वापर करण्यात आला.
- पीडित/मृतक महिलेचा ओळख पटविणे कामी नागपुर शहर , नागपुर परिक्षेत्र अमरावती शहर , अमरावती परिक्षेत्र तसेच मध्यप्रदेश राज्यातील पांढुर्णा, छिंदवाडा, सिवणी जिल्हयातील सर्व मिसींग व्यक्तींची माहीती प्राप्त करून विश्लेषन करण्यात आले.
- तपासादरम्यान शेल्टर होम तसेच समाजसेवकांना विचारपुस करण्यात आली. समाजसेवकांकडुन पीडित महिलेचा खापरखेडा ते दहेगाव मार्गावर शेवटचा दिसलेला फोटो प्राप्त झाला. या महत्त्वपूर्ण माहितीमुळे तपासाला नवी दिशा मिळाली .

आरोपीची माहीती :—

सदर गुन्हयात दिनांक ०६/०७/२०२६ रोजी पोलीसांनी आरोपी नामे सुधाकर दादाराव मंडपे, वय ४८ वर्षे, रा. बन्साळी टाकळी, ता. सावनेर, जि. नागपूर याला श्रीकृष्ण नगर, नागपुर येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीला दिनां ११/०७/२०२६ रोजी पर्यंत ५ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.

आरोपीचा पूर्व गुन्हेगारी इतिहास पडताळून तपास करण्यात आला. आरोपीवर यापूर्वीही महिला अत्याचाराचे गुन्हे नोंद असल्याची माहीती उघड झाली आहे. सन २००५ मध्ये कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे एक बलात्काराचा गुन्हा नोंद असून सन २०१८ मध्ये सावनेर पोलीस स्टेशनला विनयभंगाचा गुन्हा नोंद आहे. याव्यतिरीक्त पोलीस स्टेशन सावनेर येथे मोवाहन अधिनियम कलम १८५ अन्वये १ गुन्हा आणि भादवि कलम २७४,३३७,३३८ अन्वये १ गुन्हा असे गुन्हे नोंद आहे.

INVESTIGATION STEP 2

## Tracing the Accused via CCTV

A lead indicated the victim was last seen in the Pipla-Dahegaon area. CCTV footage recovered from the location yielded a blurred image of the accused, which was processed using Marvel AI photo-enhancement technology to generate a clear, matching image.

**BEFORE — CCTV (Blurred)**



**AFTER — AI Enhanced**



**Original Photograph**






INVESTIGATION STEP 3

## AI-Assisted Identification of the Accused

**Marvel ai generated enhance photograph of the accused**



**Actual photograph of the accused**



TheHitavada
Nagpur City Line | 2026-07-08 | Page- 1
ehitavada.com

# Chips' packet helps crack blind murder

## Rural police solve brutal rape-murder



SSP Dr Harssh Poddar briefing mediapersons on Tuesday.



A small portion of the empty chips' packet recovered from the murder scene.

■ **Staff Reporter**

AN EMPTY chips packet found at a murder scene helped Nagpur Rural Police crack a brutal rape and murder case that had almost no clues to begin with.

The body of an unidentified homeless woman, believed to be between 65 and 70 years old, was found in a farm near Patansaongi under Saoner police station jurisdiction on June 28. A post-mortem later confirmed that she had been sexually assaulted and murdered. For investigators, the case was anything but straightforward. The victim's identity was unknown, there were no eyewitnesses, and the crime scene offered little evidence. The only item that stood out was an empty chips packet of Balaji company.

Rather than dismissing it as litter, Senior SP Dr Harssh Poddar and Addl SP Anil Mhaske directed the investigation team to follow that lead. LCB Sr PI Ankush Mane and his officers contacted the Balaji chips distributor and traced the shops where the packet had been supplied. They then visited those shops and collected CCTV footage from the surrounding areas.

The effort paid off. One of the cameras captured the suspect moving through the area, giving police their first breakthrough. From there, investigators gradually built the chain of evidences and identified the accused as Sudhakar Dadarao Mandpe (48), a resident of Bansali Takli in Saoner taluka. He was arrested from Nagpur city on July 6 and has been remanded to five days of police custody.

SSP Dr Poddar said the case was solved through scientific investigation, careful collection of evidence and effective

**Contd on page 2**

Powered by Bharati Web

# AI reconstructs face, helps cop nab sexual predator

Soumitra.Bose@timesofindia.com

**Nagpur:** A gruesome unnatural sexual assault and murder of an elderly woman in her Sixties, was cracked within 10 days by effectively deploying the state-of-the-art AI technology — MARVEL or Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement to reconstruct the faces of the victim and accused.

## CHIPS PACKET EMERGES KEY CLUE







A team under Poddar and additional superintendent of police, Anil Mhaske, was formed involving officers from local crime branch, Saoner police, Kelvad police and cyber police station. MARVEL AI played a pivotal role from the outset, said investigation officer SDPO Sagar Kharde

- Repeat offender **Sudhakar Mandpe** arrested from Saoner area
- Police analyse **52,000** telecom records and 15,000 vehicle data points
- **500** CCTV cameras scanned; footage helps identify suspect

**MARVEL AI's photo enhancement technology reconstructed the suspect's face and body, achieving approximately 85% similarity. Some labourers identified him as a man who stayed with daughter at Bokhara in Nagpur city. We had picked him up from Bokhara**

**HARSSH A PODDAR** | SENIOR SP, NAGPUR RURAL

The woman's semi-nude, decomposed body was found on June 28 by Nagpur rural police at a farmland in Patansaongi in Saoner police limits. Sources said, the assailant had inserted his hand from the rear and taken out a portion of the intestines with forensic experts flagging the forcible insertion as cause of shock that triggered death. The accused, Sudhakar Mandpe, a repeat offender with a history of crimes against women, was arrested on Monday.

Initially, a case of accidental death was registered, but after the autopsy report, a rape-and-murder FIR was lodged at Saoner police station.

A crucial breakthrough came from scientific examination of chip packet wrappers found at the scene, analysis of online transaction records of local vendors, examination of around 52,000 telecom data trajectories and mappings, questioning at least 90 local workers and residents and visits to a nearby brick kiln and farmhouse. Also, data pertaining to 15,000 vehicles from the Regional Transport Department was analysed.

"The chip dealer told cops that he supplied the packets at a few shops on Dahegaon-Khaparkheda road. That was the first clue," said senior SP, Nagpur rural, Harssh A Poddar, adding the probe presented formidable challenges as the victim had no immediate identification, eyewitnesses, or direct leads.

Since the woman's face was decomposed, the MARVEL's photo enhancement and face reconstruction technology was used to generate a clear image. Missing persons data from Nagpur city and rural areas, Amravati region, and Madhya Pradesh districts were analysed.

"The reconstructed face was circulated in the social media. A Koradi-based social worker claimed to have spotted the woman on Khaparkheda- Dahegaon and had sent her photo to his Saoner counterparts," said Poddar.

Simultaneously, teams scrutinized footage from 500 CCTV cameras in the vicinity. "A footage from a travels office at Dahegaon had caught the assailant with cap and scarf stalking the victim. The footage helped," said Poddar.

# चिप्सच्या पाकिटावरून पोलिसांना मिळाली दिशा

## मार्व्हलवरून मिळाला बलात्कार करून हत्या करणारा मारेकरी

म. टा. प्रतिनिधी, नागपूर



मार्व्हल तंत्रज्ञानाने तयार केलेले मारेकऱ्याचे छायाचित्र.

जिल्ह्यात गाजत असलेल्या महिलेवरील बलात्कार व खुनाच्या रहस्यमय ठरत असलेल्या प्रकरणाच्या तपासाला चिप्सच्या पाकिटावरून दिशा मिळाली. ग्रामीण पोलिसांनी 'मार्व्हल' या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या आधारे मारेकऱ्याला गजाआड केले. सुधाकर दादाराव मंडपे (वय ४८, रा. भन्साळी टाकळी, ता. सावनेर), असे अटकेतील मारेकऱ्याचे नाव असून, मृत ६० वर्षीय महिलेची ओळख अद्यापही पटलेली नाही.

सावनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाटणसावंगीतील एका शेतात २८ जून रोजी ६५ वर्षीय महिलेचा मृतदेह आढळला. याप्रकरणी सावनेर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. शवविच्छेदन अहवालात बलात्कार केल्यानंतर हाताने गळा आवळून तिचा खून झाल्याचे नमूद करण्यात आले. पोलिसांनी बलात्कार व खुनाचा गुन्हा दाखल करीत तपास सुरू केला. जिल्ह्यात हे प्रकरण चांगलेच गाजत असल्याने या रहस्यमय बलात्कार करून खून प्रकरणाचा छडा लावण्याचे आव्हान ग्रामीण पोलिसांसमोर उभे ठाकले. पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के, उपविभागीय पोलिस अधिकारी सागर खर्डे यांना या हत्याकांडाचा छडा लावण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, स्थानिक गुन्हेशाखा पोलिसांसह विविध पथकांनी तपास सुरू केला. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता परिसरात चिप्सचे रिकामे पाकिट आढळले. दारू पिऊन बलात्कार केल्यानंतर महिलेचा खून करण्यात आला असावा, या निष्कर्षापर्यंत पोलिस पोहोचले. त्यानंतर पोलिसांनी पाटणसावंगीसह विविध ठिकाणी मृत महिला व मारेकऱ्याची ओळख पटविणे सुरू केले.

दहेगाव परिसरातील दुकानांमध्ये चिप्सचे पाकिट विकले जात असल्याचे कळताच पोलिसांनी या दुकानांमध्ये चौकशी केली. या परिसरातील १८२ सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. एका फुटेजमध्ये लाल रंगाचे शर्ट व टोपी घातलेला इसम आढळला. पोलिसांना त्याच्यावर संशय आला. परंतु, त्याचा चेहरा अस्पष्ट होता. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मारेकऱ्याचे त्यावेळेच दूरचे छायाचित्र काढले. मार्व्हलच्या मदतीने त्याचे संपूर्ण छायाचित्र तयार केले. या छायाचित्राआधारे स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाने मारेकऱ्याचा शोध सुरू केला. पोलिसांनी परिसरातील तब्बल ९०पेक्षा अधिक श्रमिक व नागरिकांना हे छायाचित्र दाखविले. एका नागरिकाने ओळख पटवली. मंडपे याची मुलगी बोखारातील श्रीकृष्णनगरमध्ये राहात असल्याची माहिती त्याने दिली. स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाने श्रीकृष्णनगर भागातून मंडपे याला अटक करताच त्याने बलात्कार करून खून केल्याचे मान्य केले.

### मंडपेला बलात्काराची पार्श्वभूमी

पोलिसांनी सुधाकर मंडपे याचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असता, २००५मध्ये मंडपे त्याच्याविरूद्ध कळमेश्वर पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. याशिवाय २०१८मध्ये त्याच्याविरूद्ध सावनेर पोलिसांनी विनयभंगाचाही गुन्हा दाखल केला होता. याच पोलिस स्टेशनमध्ये त्याच्याविरूद्ध आणखी एक गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी मंडपे याची पाच दिवस पोलिस कोठडी घेतली आहे. मृत महिला निराधार होती. ती सतत खापरखेडा व सावनेर परिसरात फिरायची. याचाच फायदा घेत मंडपेने बलात्कार करून तिचा खून केल्याचे समोर आले.

लोकमत

# अखेर 'मार्वल-एआय'ने उलगडला अमानुष अत्याचार-हत्येचा गुन्हा

## एसपी हर्ष पोद्दार यांची माहिती : कोणताच धागादोरा नसताना लावला छडा

लोकमत न्यूज नेटवर्क



हर्ष पोद्दार

**नागपूर** : निर्जन ठिकाणी एका वृद्ध महिलेचा कुजलेला मृतदेह आढळतो. चेहरा पूर्णतः बिघडला असल्याने ओळख पटविणे कठीण होते. ना कुठला धागा, ना कुठला दोरा. अशात तिचा मृत्यू पाशवी अत्याचारामुळे झाल्याचा धक्कादायक अहवाल शवविच्छेदनातून पुढे येतो आणि या पाशवी अत्याचाराच्या गुन्ह्याचा छडा लावण्याचे आव्हान पोलिसांपुढे उभे राहते. मात्र, तंत्रज्ञानाची मदत घेऊन मृत महिलेची ओळख पटविण्यासोबतच तिचा बळी घेणारा विकृत नराधमही पोलिस गजाआड करतात.

अत्याधुनिक तंत्रज्ञान कसे उपयुक्त आहे, त्याची साक्ष पटविणाऱ्या पाटणसावंगीतील बलात्कार-हत्या प्रकरणाची माहिती नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, २८ जूनला अनोळखी वृद्धेचा मृतदेह निर्जन ठिकाणी पाटणसावंगी पोलिसांना मिळाला होता. मृतदेह पुरता कुजला होता. घटनास्थळी ओळख पटविणारा कोणताच धागादोरा नव्हता. मृत महिलेचे वय ६० ते ७० वर्षे होते. या वृद्धेवर अत्यंत पाशवी पद्धतीने अत्याचार झाल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचा अहवाल डॉक्टरांनी दिला. ती कोण, कुठली आणि तिच्यावर कुणी बलात्कार करून तिचा बळी घेतला, ते शोधणे कठीण होते. त्यामुळे पोलिसांनी 'मार्वल-एआय' या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणालीच्या आधारे उपलब्ध छायाचित्रांवर प्रक्रिया करून मृत महिलेचा चेहरा वास्तवदर्शी स्वरूपात पुनर्निर्मित केला. हा फोटो सर्व पोलिस यंत्रणांना तसेच सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला. त्यातून एक धागा मिळाला. समाजसेवक विनोद भिंगारे यांनी घटनेच्या आदल्या दिवशी खापरखेडा परिसरात ही वृद्ध महिला भटकताना पाहिली होती. त्यावेळी त्यांनी तिचा फोटो काढून समाजसेवक हितेश बनसोड यांच्याकडे पाठविला होता. पोलिसांनी हाच फोटो 'मार्वल-एआय'मध्ये प्रक्रिया करून महिलेची ओळख पटविली. यानंतर सीसीटीव्ही फुटेज तपासले असता एक व्यक्ती तिला दुचाकीवरून घेऊन जाताना दिसला. त्याचा शोध घेऊन सोमवारी आरोपी सुधाकर दादाराव मंडपे (४९, रा. भंसाळी, टाकळी) याला बोखारा येथून अटक केली. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपास सुरू आहे.

### आरोपी विकृतच

**आरोपी विकृत वृत्तीचा आहे. त्याला पत्नी, मुलगा आणि विवाहित मुलगी आहे. वेडसर वाटणारी मृत महिला ६० ते ७० वर्षांची आहे. तिच्यावर आरोपीने पाशवी अनैसर्गिक अत्याचार केल्यानेच तिचा मृत्यू झाला. त्याने २१ वर्षांपूर्वीदेखील कळमेश्वरजवळ एका बालिकेवर अत्याचार केला होता, असे प्राथमिक तपासात पुढे आले.**

### चिप्सचे रिकामे पॅकेट कामी

या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी पोलिसांनी घटनास्थळी सापडलेल्या चिप्सच्या एका रिकाम्या पॅकेटचा आधार घेतला. ते पॅकेट कुठून घेतले, त्याची माहिती काढून आम्ही आरोपीचा येण्या-जाण्याचा मार्ग शोधला. नंतर 'मार्वल-एआय'चा वापर करून या प्रकरणाचे गूढ उलगडले. त्यासाठी अतिरिक्त पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के आणि सहायक पोलिस अधीक्षक सागर खर्डे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा आणि ग्रामीण पोलिसांनी विशेष परिश्रम घेतल्याचेही अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी पत्रकारांना सांगितले.

### 'एआय' प्रभावी ठरतेय

क्लिष्ट गुन्ह्याच्या तपासात कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयुक्तता या प्रकरणाने अधोरेखित झाली आहे. विशेषतः अज्ञात मृतदेहांच्या प्रकरणांत वास्तवदर्शी चेहऱ्यांची पुनर्निर्मिती आणि संशयितांची ओळख अधिक अचूकपणे पटविण्यासाठी हे तंत्रज्ञान प्रभावी ठरत असल्याचेही पोद्दार यांनी यावेळी सांगितले.